**MaharashtraTimes**
**Title :**
**Author :**
**Location :**
**Article Date : 01/17/2015**

# मुंबईतील कोस्टल रोड तीन महिन्यांत

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

जागोजागी जॅम होणाऱ्या मुंबईतील वाहतुकीची कोंडी फोडणे हाच शहराच्या विकासातील कळीचा मुद्दा आहे. एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भूमिगत मेट्रो अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना राज्य सरकारने मंजुरी दिली असून, पुढील दोन-तीन महिन्यांत कोस्टल रोड प्रकल्पही मार्गी लावला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली.

'महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन'ने आयोजित केलेल्या एकदिवसीय 'महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट'मध्ये फडणवीस यांनी मुंबईकरांचा प्रवास सुखदायी करण्याचे आश्वासन दिले. शहरांच्या विकासाबाबत केंद्रातील मोदी सरकारचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक आहे. कोस्टल रोड प्रकल्प सुरू करण्यासाठी फक्त पर्यावरण खात्याची परवानगी मिळणे बाकी आहे. आता त्यात दिरंगाई होणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

## 'किनारा' वेगवान

नरिमन पॉइंट-मालाड मार्वे रोड-बोरीवली असा ३५.५ किमीचा हा कोस्टल रोड उभा करण्यासाठी दहा हजार कोटींचा खर्च येणार आहे. कोस्टल रोड रस्ता, फ्लायओव्हर आणि समुद्री टनेल अशा तीन मार्गांनी प्रवास करणार आहे. या प्रकल्पासंदर्भात गेल्या आठवड्यात मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय पर्यावरण खात्याकडे सादरीकरण केले आहे.

## 'पहिले उड्डाण' २०१९मध्येच!

मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर असल्याने रस्त्यावरील वाहतूक जेवढी प्रवाही राहिली पाहिजे, तेवढी आकाशातील वाहतूकही राहिली पाहिजे. त्यासाठी पनवेलमधील नवा विमानतळ प्रकल्प प्राधान्याने पूर्ण केला जाणार आहे. सन २०१९मध्ये नवी मुंबई विमानतळावरून पहिले उड्डाण होईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

## एकाच तिकिटावर प्रवास?

बृहन्मुंबईतील चाकरमान्यांना नजिकच्या काळात एकाच तिकिटावर प्रवास करण्याची सुविधा मिळण्याची शक्यता आहे. लोकल रेल्वे, बेस्ट बस आणि मेट्रो या तीनही प्रवासासाठी एकच तिकीट देण्याबाबत संबंधित यंत्रणांशी चर्चा सुरू असल्याची माहिती 'एमएमआरडीए'चे आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी दिली.